MHST200003822025

**<u>संप्रमाण अर्ज क्र.३/२०२५</u>**

**<u>राजेंद्र कासुर्डे व.१</u>**
**<u>विरुध्द</u>**
**<u>कोणीही नाही.</u>**

**<u>निशाणी क्र.१ वरील आदेश</u>**

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज मयत गंगुबाई बबन कासुर्डे यांनी करुन ठेवलेल्या मृत्यूपत्रबाबतचे संप्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार क्र. १ व २ यांची आई कै.गंगुबाई बबन कासुर्डे यांचा मृत्यू दि.१०/०६/२०२५ रोजी मौजे हनुमान रोड, पाचगणी ता.महाबळेश्वर येथे झालेला आहे. मयत गंगुबाई कासुर्डे या कै.धोंडू उर्फ धोंडीबा गोविंदा वाडकर व कै.जनाबाई धोंडीबा वाडकर यांची एकमेव मुलगी होत्या. धोंडू उर्फ धोंडीबा गोविंदा वाडकर हे दि.०९/०४/१९५५ व जनाबाई धोंडीबा वाडकर या दि.१७/०९/१९७६ रोजी मयत झाल्या आहेत. धोंडू व जनाबाई यांचे मृत्यूनंतर त्यांच्या सर्व मिळकतीस मौजे बोरगाव ता.वाई जि.सातारा गावचे फेरफार क्र.२३४३ ने गंगुबाई हिचे नाव वारस म्हणून नोंदविलेले आहे. गंगुबाई हिचे मृत्यूपर्यन्त तिचा सेवासुश्रुषा, सांभाळ तिची मुले म्हणजेच अर्जदार क्र.१ व २ यांनी केलेला आहे. गंगुबाई हिने तिचे हयातीत तिचे मालकी हक्क वहिवाटीत, अधिकारात असलेल्या मौजे बोरगाव ता.वाई जि.सातारा येथील गट नं. ३/१३, क्षेत्र ०.०२आर, गट नं.३४/४ क्षेत्र ०.०५.१०आर, गट नं.१११/२८ क्षेत्र ०.९२आर, गट नं.१५३/९ क्षेत्र ०.२१आर, गट नं.३/२३/१ क्षेत्र ०.०२आर या मिळकतींचे दि.०३/०८/२०२३ रोजी नोंदणीकृत मृत्यूपत्र साक्षीदारांसमक्ष अर्जदार क्र.१ व २ यांचे नावे करुन ठेवलेले आहे. करिता अर्जदार यांनी प्रोबेट सर्टिफिकेटची मागणी केली. त्यामुळे, अर्जदार यांना सदरचा अर्ज दाखल करणे भाग पडले. सबब, अर्जदार यांनी सदरील मृत्यूपत्राबाबत संप्रमाणपत्र मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रस्तुत प्रकरणामध्ये 'दै. ऐक्य' या वर्तमानपत्रामध्ये दि.०८.०८.२०२५

रोजी जाहीर नोटीस (नि.क्रं.१०) प्रसिध्द करुन सदरील अर्जाच्या अनुषंगाने आक्षेप मागविणेत आले. तसेच जाहीरनामा (नि.क्रं.०७) प्रसिध्द करणेत आला आहे. परंतू, आजपावेतो प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याबाबत कोणतीही हरकत न्यायालयास प्राप्त झालेली नाही.

४. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार क्र.१ याने (नि.क्र.११) वर स्वतःचे (सा.क्र.१) पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. तसेच, कथित मृत्युपत्रावरील साक्षीदार किसन मारुती मालुसरे (सा.क्र.२) यांचे पुराव्याचे शपथपत्र (नि.क्र.२२) वर, साक्षीदार सुरज सुधीर माने (सा.क्र.३) याचे पुराव्याचे शपथपत्र (नि.क्र.२४), दाखल केले आहे. त्यानंतर अर्जदार यांनी नि.क्रं.३० वर तोंडी व लेखी पुरावा बंद करणेबाबत पुरशीस दाखल केली आहे. तसेच मयत गंगुबाई कासुर्डे हिला अर्जदार क्र.१ व २ व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाही अशी पुरशीस (नि.क्र.३१) दाखल केली आहे.

५. अर्जदारांतर्फे प्रस्तुत अर्जाच्या कामी मयत गंगुबाई बबन कासुर्डे हिचे मुळ मृत्यूपत्र (नि.क्र.२३), मयत गंगुबाई बबन कासुर्डे हिचा मृत्यु उतारा (नि.क्र.१२), मौजे बोरगाव ता.वाई जि.सातारा येथील गट नं.३/१३, ३४/४, १११/२८, १५३/९ व ३/२३/१ चा ७/१२ उतारा (अनुक्रमे नि.क्र.१३ ते १७ ), फेरफार क्र.२३४३ चा उतारा (नि.१८), अर्जदार क्र.१ व २ यांचे आधारकार्डची प्रत (नि.१९) अशा कागदपत्रांच्या प्रती अभिलेखावर दाखल केल्या आहेत.

६. अर्जदारांतर्फे वकिल यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. प्रस्तुत अर्जाची परिस्थिती पाहता खालीलप्रमाणे मुद्दे माझ्यासमक्ष उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अर्जदार क्र.१ व २ हे सिद्ध करतात काय की, मयत | |

| | | |
|---|---|---|
| | गंगुबाई बबन कासुर्डे यांनी दि.०३/०८/२०२३ रोजी त्यांचे लाभात केलेले मृत्यूपत्र हे कायदेशीर आहे ? | **... होय.** |
| २) | अर्जदार हे मागणी केल्याप्रमाणे संप्रमाणपत्र मिळणेस पात्र आहेत ? | **... होय.** |
| ३) | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**-: का र ण मि मां सा :-**

**मुद्दा क्र.१ व २ करीता -**

७. मुद्दा क्र.१ व २ हे एकमेकांशी निगडीत असल्याने कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचा एकत्रितपणे ऊहापोह करणेत येत आहे. अर्जदार यांनी अर्जातील मजकूर शाबीत करणेसाठी अर्जदार क्र.१ याने पुराव्याचे शपथपत्र नि.क्रं ११ वर दाखल केले आहे. त्यामध्ये अर्जातील मजकुराची पुनरावृत्ती केली आहे. त्यामुळे सदरील मजकुर याठिकाणी लिहिणेचा टाळणेत आला आहे. अर्जदारांतर्फे साक्षीदार किसन मारुती मालुसरे (सा.क्र.३) याने अर्जदाराच्या पुराव्याला दुजोरा देवून कथित मृत्यूपत्र हे त्याचेसमक्ष करणेत आलेवर त्यांनी त्यावर साक्षीदार म्हणुन सहया केल्या असल्याचे कथन केले आहे.

८. अर्जदार यांनी नि.क्रं.१२ वर गंगुबाई बबन कासुर्डे हिचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल केले आहे. सदरील मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता गंगुबाई बबन कासुर्डे ही दि.१०.०६.२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसून येत आहे. तसेच नि.क्रं.२३ वरील मुळ मृत्युपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, मयत गंगुबाई बबन कासुर्डे हिने सदर मृत्युपत्राद्वारे त्यांची मौजे बोरगाव, ता.वाई जि.सातारा येथील गट नं. ३/१३, ३४/४, १११/२८, १५३/९ व ३/२३/1 या मिळकती अर्जदार क्र.१ व २ यांना दिलेल्या आहेत. सदर मृत्यूपत्रास साक्षीदार क्र.२ व ३ हे साक्षीदार आहेत.

९. अर्जदार व साक्षीदार यांच्या पुराव्याला कोणीही आव्हानित केलेले नाही. तसेच, त्यांचा पुरावा खोडून काढलेला नाही. याशिवाय, मयत गंगुबाई बबन कासुर्डे यांचे दि.०३.०८.२०२३ रोजीचे मृत्यूपत्राला देखील कोणीही आव्हानित केलेले नाही. अर्जदार यांनी पुराव्याअंती स्वतःची बाजू तसेच, मयत गंगुबाई बबन कासुर्डे यांनी अर्जदार क्र.१ व २ च्या लाभात दि.०३.०८.२०२३ रोजी करुन ठेवलेले मृत्यूपत्र सिध्द केले आहे. तसेच, सदर मृत्यूपत्राबाबत संप्रमाण जारी करणेस कायदयाची कुठेही स्पष्टपणे बाधा नाही. परिणामत: सदरचा अर्ज मंजुर करणे क्रमप्राप्त होईल. सबब, मुद्दा क्रमांक १ व २ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित येत आहेत व मुद्दा क्र.३ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे :-

**-: आ दे श :-**

१) प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) अर्जदार क्र.१ व २ यांना मयत गंगुबाई बबन कासुर्डे यांनी त्यांचे लाभात दि.०३.०८.२०२३ रोजी करुन ठेवलेले मृत्यूपत्र सिद्ध केल्याने त्यासंदर्भात संप्रमाणपत्र (Probate Certificate) जारी करणेत यावे.

३) अर्जदार यांनी संप्रमाण अर्जावर नियमाप्रमाणे मुद्रांक शुल्क दयावा.

४) सहाय्यक अधीक्षक, दिवाणी न्यायालय व.स्तर, वाई यांना असे आदेशीत करणेत येते की, त्यांनी मयत गंगुबाई बबन कासुर्डे यांचे दि.०३.०८.२०२३ रोजीचे अस्सल मृत्यूपत्र न्यायालयाचे ताब्यात संरक्षीत ठेवावे व मृत्यूपत्राची सत्यप्रत प्रमाणित करुन संप्रमाण अर्जासोबत जोडावी.

५) येणेप्रमाणे आदेशासह सदरचा अर्ज निकाली करण्यात येत आहे.

Digitally signed by KALIDAS SIDRAM SURYAWANSHI
Date: 2026.06.17 16:53:13 +0530

**( के.एस.सुर्यवंशी )**

**दि.१७.०६.२०२६**

**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, वाई**
**जि.सातारा.**

## CERTIFICATE

I am affirm that the contents of this P.D.F., file Order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer :- Gauri Mahesh Kulkarni (Steno Grade-II)
Court :- Civil Judge Senior Division, Wai.
Dist. Satara.
Date :- 17.06.2026
Order signed by the presiding officer on :- 17.06.2026
Judgment/order uploaded on :- 17.06.2026